ठळक बातम्या

- पुण्यातल्या माण- हिंजवडी- शिवाजीनगर पिंक लाईन मेट्रोचं प्रधानमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन, उद्यापासून नागरिकांसाठी सेवा सुरू होणार

- रब्बी पिकांच्या पेरण्यांमधे गेल्या वर्षीच्या तुलनेत ४६ टक्क्यांनी घट, लवकर पेरण्या करण्याचं केंद्रीय कृषी मंत्र्यांचं आवाहन

- आदिवासीबहुल जिल्ह्यात आधार कार्ड नोंदणीसाठी विशेष शिबिर राबवले जाणार

आणि

- शेअर बाजारात सलग चौथ्या सत्रात जोरदार तेजी, आठवडाभरात सेन्सेक्स साडे ३ हजार अंकांनी वधारला

<><><><><><>

पुणे मेट्रोच्या विस्तारामुळे शहराच्या विकासाला आणि शहरातील वाहतुकीला नवी गती मिळेल असा विश्वास प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज व्यक्त केला. माण-हिंजवडी ते शिवाजीनगर या मेट्रोच्या तिसऱ्या मार्गिकेचं उद्घाटन आणि 'पुणे मेट्रोच्या दुसऱ्या टप्प्यातल्या कामांचं भूमिपूजन पंतप्रधानांनी दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून केलं, त्यावेळी ते बोलत होते.

होल्ड प्रधानमंत्री बाइट

दुष्काळामुळं अडचणीत असलेल्या राज्यातल्या शेतकऱ्यांच्या पाठीशी केंद्र आणि राज्य सरकार संवेदनशीलतेनं उभं असल्याची ग्वाही प्रधानमंत्र्यांनी दिली.

पुणे, पिंपरी-चिंचवड आणि पुणे महानगर प्रदेश परिसरात मेट्रो, इलेक्ट्रिक बस, इनर रिंगरोड, आउटर रिंगरोड, बोगदे आणि नव्या विमानतळासह आधुनिक वाहतूक सुविधांचे जाळे उभारण्यात येत आहे. या पायाभूत सुविधांच्या माध्यमातून २०३० पर्यंत पुणे महानगर प्रदेश देशातील महत्त्वाचे मोबिलिटी केंद्र बनेल, असा

विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. देशात सार्वजनिक-खासगी भागीदारीतून मेट्रो प्रकल्प उभारण्याच्या धोरणानंतर शिवाजीनगर-हिंजवडी हा पहिला प्रकल्प ठरला आहे. पुणे शहरातील वाहतूक कोंडी कमी करून नागरिकांचा प्रवास अधिक वेगवान, सुरक्षित आणि आरामदायी करण्यामध्ये मेट्रो महत्त्वाची भूमिका बजावणार आहे, असं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.

सुमारे १०० महिला रेल्वे चालक आणि स्थानकांवरच्या ५० टक्के महिला कर्मचारी या मार्गिकेचं संचालन करणार आहेत, असं उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार म्हणाल्या.

होल्ड - सुनेत्रा पवार

उद्यापासून या मार्गिकेवर व्यावसायिक प्रवासी सेवा सुरू होणार आहे. माण डेपो आणि जिल्हा न्यायालय स्थानकावरून सकाळी सहा वाजता पहिली मेट्रो सुटेल, तर रात्री अकरा वाजून चाळीस मिनिटांनी जिल्हा न्यायालय स्थानकावरून शेवटची मेट्रो धावेल. गर्दीच्या वेळी दर सहा मिनिटांनी, तर इतर वेळी दर बारा मिनिटांनी मेट्रो उपलब्ध असेल.

<><><><><>

देशभरातल्या रब्बी पिकांच्या पेरण्या गेल्या वर्षीच्या तुलनेत ४६ टक्क्यांनी कमी झाल्याचं कृषी मंत्रालयाने म्हटलं आहे. गेल्या वर्षीच्या ३० ऑक्टोबर पर्यंत देशात सुमारे ६० लाख हेक्टर क्षेत्रात पेरण्या झाल्या होत्या. त्या तुलनेत यावर्षी सुमारे ३७ लाख हेक्टर क्षेत्रात पेरण्या झाल्या आहेत. यावर्षीच्या जून ते सप्टेंबर मधल्या मान्सूनच्या प्रमाणात १३ टक्के घट झाल्यामुळे मातीतली आर्द्रता कमी झाली आहे, शिवाय सिंचनासाठी पाण्याची उपलब्धता कमी आहे, त्यामुळे रब्बी पेरण्यांवर परिणाम झाल्याचं तज्ज्ञांनी म्हटलं आहे.

खरिपाच्या कापण्या झाल्यानंतर जमिनीतल्या शिल्लक आर्द्रतेचा उपयोग करून घेण्यासाठी शेतकऱ्यांनी रब्बीच्या पेरण्या लवकरात लवकर कराव्यात, तसंच भरड धान्य, हरभरा, मसूर, मोहरी इत्यादी कमी पाण्यात होणाऱ्या पिकांची लागवड करावी, असं केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंग चौहान यांनी म्हटलं आहे. अशा पिकांची बियाणी कृषिशास्त्रज्ञांनी विकसित करून शेतकऱ्यांना उपलब्ध करून देण्याचं आवाहन त्यांनी केलं आहे.

रब्बी पिकांसाठी आवश्यक खतांचा आणि प्रमाणित बियाण्यांचा साठा पुरेशा प्रमाणात असून जिल्हा स्तरावर तो उपलब्ध करून दिला जाईल अशी माहिती कृषी मंत्रालयाने दिली आहे.

<><><><><>

क्षयरोगमुक्त महाराष्ट्र अभियान अंतर्गत क्षयरोगाचं जलद निदान करणारी ट्रू नेट क्वाट्रो आण्विक निदान यंत्रं राज्यभर वापरण्यात येणार आहेत. राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन कार्यक्रमांतर्गत राज्यभर प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्रामीण रुग्णालये आणि जिल्हास्तरीय आरोग्य संस्थांमध्ये ही यंत्रे बसविण्यात येणार आहेत.

<><><><><>

राज्यातल्या सोळा आदिवासी बहुल जिल्ह्यांमध्ये आधार कार्डपासून वंचित असलेल्या नागरिकांसाठी तातडीनं विशेष मोहीम राबवावी, तसंच जन्म नोंदणीसाठी विशेष शिबिरं आयोजित करावीत, असे निर्देश महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले आहेत. आज मंत्रालयात यासंदर्भात झालेल्या बैठकीत ते बोलत होते. प्रलंबित वैयक्तिक आणि सामूहिक वनहक्क दावे निकाली काढण्यासाठी विशेष कालबद्ध मोहीम राबवण्याचे निर्देशही महसूल मंत्र्यांनी दिले. आदिवासी बांधवांना शासकीय योजनांचा लाभ घेताना अडचणी येऊ नयेत, यासाठी प्रशासनानं दक्ष राहण्याची सूचनाही महसूलमंत्र्यांनी केली.

<><><><><>

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी आज बीड बसस्थानकाची पाहणी केली. एसटी महामंडळाचं उत्पन्न वाढविण्यासाठी नवीन बसेस उपलब्ध करून द्याव्यात आणि अधिक उत्पन्न देणाऱ्या मार्गांना प्राधान्य द्यावे, असे निर्देश त्यांनी अधिकाऱ्यांना यावेळी दिले. बसस्थानकाच्या २०० मीटर परिसरात खासगी वाहनांद्वारे प्रवाशांची वाहतूक करणाऱ्यांवर कठोर कारवाई करायचे निर्देशही त्यांनी दिले. एसटी कर्मचाऱ्यांचे वेतन वेळेत जमा होईल तसंच त्यांच्या प्रश्नांवर सकारात्मक कार्यवाही करण्यात येईल, असं त्यांनी माध्यमांशी संवाद साधताना सांगितलं.

<><><><><>

मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समध्ये आज दिवसअखेर १ हजार २२५ अंकांची वाढ झाली आणि तो ७६ हजार ९१८ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही ३७० अंकांची वाढ नोंदवत २३ हजार ८११ अंकांवर बंद झाला. गेल्या आठवडाभरात सेन्सेक्स ३ हजार ६०० हून अधिक अंकांनी वधारला आहे.

<><><><><>

अभिनेत्री दिया मिर्झा हिचा समावेश असलेला फटाकेविरहित दिवाळी मोहिमेसंबंधीचा व्हिडीओ समाजमाध्यमावर पुन्हा प्रदर्शित करायचे आदेश आज मुंबई उच्च न्यायालयाने बृहन्मुंबई महानगरपालिकेला दिले. त्याचबरोबर पर्यावरणपूरक दिवाळी मोहिमेवरून निर्माण झालेल्या वादावर तीव्र आक्षेप घेत न्यायालयाने जातीय रंग देणाऱ्या राजकीय नेत्यांबद्दलही नाराजी व्यक्त केली. उच्च न्यायालयाने नागरी प्रशासनाला सामाजिक जागृतीसाठी सेलिब्रिटींना सहभागी करून घेण्याचा सल्ला दिल्यानंतर पालिकेने दिया मिर्झा हिचा व्हिडीओ प्रदर्शित केला होता.

<><><><><>

अतिक्रमण हटवण्यासंबंधीच्या निर्देशांचं पालन न केल्याबद्दल सर्वोच्च न्यायालयाने आज बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आयुक्त अश्विनी भिडे यांना फटकारलं. बेस्ट बससाठी निश्चित केलेल्या जमिनीवरचं अतिक्रमण हटवण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले होते. या निर्देशांचं पालन करण्यासाठी अधिक वेळ मिळावा अशी याचिका पालिका आयुक्तांनी केली होती. या सुनावणीत न्यायालयाने भिडे यांना कारणे दाखवा नोटीस बजावली असून ५ लाख रुपयांचा दंड ठोठावला. तसंच, न्यायालयाचा अवमान केल्याबद्दल कारवाई का सुरू करण्यात येऊ नये, याविषयी जबाब मागितला.

या याचिकेवर सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची आणि व्ही मोहना यांच्या पीठासमोर आज सुनावणी झाली.

<><><><><>

अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँकेच्या निवडणुकीत सहकार विकास पॅनलनं १७ जागा जिंकत बहुमत मिळवलं आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस सांगतील तोच जिल्हा बँकेचा अध्यक्ष होईल, असं निवडणूक निकालानंतर बातमीदारांशी बोलतांना भाजपाचे राज्य उपाध्यक्ष सुजय विखे यांनी सांगितलं.

अपक्ष संचालक संजीवनी शिंदे यांनी पाठिंबा दिला असून विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांच्या दोन जागांचाही पाठिंबा असल्याचं त्यांनी सांगितलं.

<><><><><>

सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक पदासाठीच्या निवडणुकीत आमदार गोपीचंद पडळकर, माजी मंत्री अजित घोरपडे, माजी खासदार संजय पाटील, अण्णासाहेब कोरे, कृष्णा कांबळे, आणि संभाजी कचरे विजयी झाले आहेत. संचालकपदाच्या २१ जागांपैकी १५ उमेदवार बिनविरोध निवडून आले होते. उर्वरित ६ जागांसाठी मतदान झालं होतं.

<><><><><>

अभिनेता टायगर श्रॉफवर झालेल्या गोळीबार प्रकरणी फरार आरोपी अनिल पंडित याची भावजय सुनेहा पंडित हिला आज मुंबईतल्या विशेष मकोका न्यायालयाने १६ नोव्हेंबरपर्यंत पोलीस कोठडी दिली. या प्रकरणातल्या सहआरोपींना पैसे देण्यासाठी तिच्या बँक खात्याचा वापर करण्यात आला होता. या प्रकरणात अटक झालेली ती तेरावी आरोपी आहे.

<><><><><><>

आदिवासी विकास विभागाच्या नंदुरबारला असलेल्या मुलींसाठीच्या शासकीय वसतीगृहात २० वर्षीय विद्यार्थिनीचा मृतदेह आढळून आला. ही मुलगी नर्सींगच्या दुसऱ्या वर्षात शिकत होती.

<><><><><><>

गडचिरोली जिल्ह्यात एटापल्ली तालुक्यात वाघाच्या हल्ल्यात एका शेतकऱ्याचा काल मृत्यू झाला. जारावंडी भागातली वाघाच्या हल्ल्याची ही तिसरी घटना आहे.

<><><><><><>

राज्यातील दुष्काळी परिस्थिती आणि नैसर्गिक आपत्तीच्या काळात बाधित नागरिकांना मदत करण्याबरोबरच आर्थिकदृष्ट्या गरजू रुग्णांच्या उपचारांसाठी अधिक निधी उपलब्ध व्हावा, या उद्देशाने मुख्यमंत्री सहायता निधीला आता सामाजिक सहभागाचे बळ मिळणार आहे. यासाठी राज्य सरकारनं 'महाराष्ट्र पब्लिक रिलीफ सोसायटी'ची स्थापना केली आहे. कंपन्या, संस्था, देणगीदार आणि इतर सामाजिक घटकांच्या सहभागातून अतिरिक्त निधी उभारून तो गरजू रुग्णांसह विविध आपत्तींत बाधित नागरिकांच्या मदतीसाठी वापरता येणार आहे. त्यामुळे महागड्या उपचारांची गरज असलेल्या रुग्णांना अधिक आर्थिक मदत देण्याबरोबरच दुष्काळ, नैसर्गिक आपत्ती आणि अन्य आपत्कालीन परिस्थितीतही मदतीचा हात पुढे करता येणार आहे. या नव्या व्यवस्थेमुळे हृदयरोग, कर्करोग,

मूत्रपिंडविकार, मेंदूविकार यांसह विविध गंभीर आजारांवरील शस्त्रक्रिया, महागडे आणि दीर्घकालीन उपचारांसाठी अधिक मदत उपलब्ध करून देता येणार आहे. गरजेनुसार औषधे, वैद्यकीय साहित्य आणि उपचारासाठी आवश्यक इतर बाबींसाठीही मदत करता येणार आहे. दुर्मिळ आजारांवरील उपचारांसाठीही या माध्यमातून विशेष मदत उभारता येणार आहे.

<><><><><><>

नुकत्याच पार पडलेल्या नागपूर पदवीधर, पुणे पदवीधर आणि अमरावती शिक्षक मतदारसंघातल्या विधान परिषद निवडणुकांच्या निकालांचा सखोल अभ्यास करण्यासाठी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीने चार सदस्यीय समिती नियुक्त केली आहे. या समितीमध्ये काँग्रेस कार्यकारिणीचे सदस्य बाळासाहेब थोरात, खासदार चंद्रकांत हंडोरे, आरिफ नसीम खान आणि अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सचिव बी. एम. संदीप यांचा समावेश आहे.

//<><><><><><>//